जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAY 2018
Times of India


# Question bank for SUK online entrance exam ready

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has prepared its question bank for the upcoming online entrance exam of around 22 courses and is all set to conduct the test from May 22 onwards in Sangli, Satara and Kolhapur districts.

This was announced on Wednesday by director of board of examinations and evaluation Mahesh Kakade. He told **TOI** this time all entrance exams would be conducted online but they are keeping the backup option of offline test ready.

"There could be anything like a technical glitch that can hamper the entire exam at the very last moment. Hence, we will be equipped with the Optical Mark Reader (OMR) sheets as well," he said, adding that only faculty change examination is being conducted via offline mode this year.



He added that since the last date of the registration for the exam has surpassed there will not be any kind of extension for form filling now. According to Kakade, examination centres in Sangli, Satara and Kolhapur districts have been declared for the entrance.

Most of the centres are engineering colleges considering the availability of the infrastructure in them for conducting online examination. Another varsity official said the merit list for all the entrance examinations will be declared on June 11, while the admission rounds will begin from June 23. The overall admission rounds will end by June 26, later next month.

**All entrance exams would be conducted online. A backup of offline test is also being prepared**

"Varsity with 40 different departmental courses conducts entrance examination for over 25 PG courses every year. Remaining course fall in the social sciences, languages and political sciences category and do not require entrance exam. There are many such courses which students can opt for post-graduate degree and diploma level," said a varsity official.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAY 2018
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात भाऊराव पाटील यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. ए. एम. गुरव, आर. व्ही. गुरव, एस. एस. पन्हाळकर, संभाजी शिंदे, पी. टी. पाटील, मीना पोतदार, डी. एच. पवार, जे. बी. सपकाळे, व्ही. ए. चौगुले, बी. एल. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, नीलेश बनसोडे, सहायक कुलसचिव बी. एन. वाघमोडे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
वाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स

## शनिवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवारी (ता.१२) आयोजित केला आहे. दुपारी एक वाजता विद्यापीठाच्या वाणिज्य विभागात मेळाव्याला प्रारंभ होईल. उद्योग, व्यवसाय, संस्थांच्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षा समजून घेणे, विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता वाढविण्यासाठी मेळाव्यात चर्चा होणार आहे. मेळाव्याला माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

10 MAY 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मनोभावे शिकू या

# चरित्र त्यांचे पाहा जरा..!



अभ्यास करत असताना अनेकदा अशी परिस्थिती येते की, आपण निराश होतो. अशा वेळी आपल्याकडे असणाऱ्या कलेत, आवडीच्या छंदात आपण मनाला थोडा वेळ गुंतवले तर मनावरील मळभ दूर होते. नैराश्य क्षणात दूर करण्याची ताकद त्यामध्ये असते. एखादी परीक्षा कठीण जाऊ शकते. अशा प्रसंगी निराश होण्याचे कारण नाही. अशा प्रसंगात आपली ऊर्जा टिकवून ठेवायची असेल तर, चांगल्या पुस्तकांचे वाचन करायला पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे, त्या क्षेत्रामध्ये शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या व्यक्तींची चरित्रे, आत्मचरित्रे वाचली पाहिजेत. या चरित्र वाचनातून त्या त्या क्षेत्रांतील व्यक्तींना कोणत्या हालअपेष्टांतून जावे लागले ते समजते.

फॅराडे हा जन्मत:च वैज्ञानिक नव्हता. वयाच्या तेराव्या वर्षी तो पुस्तक बांधणी कारखान्यात कामगार होता. आईनस्टाईनही सुरुवातीला पेटंट ऑफिसमध्ये काम करत होता. वॉल्ट डिस्नेची कंपनीही बुडाली होती. चरित्र वाचनाने ही यशस्वी व्यक्तिमत्त्वे त्यांच्या आयुष्यात किती मोठ्या संकटांना धैर्याने सामोरी गेली, ते लक्षात येते आणि मग आपले संकट, आपल्यासमोरील अडचण छोटी वाटू लागते.

आपली एक अडचण असते. आपण यशस्वी व्यक्तींना मोठेपणाचे लेबल चिकटवतो आणि त्यांना मोठेपण दिले की, नंतर आपण मोठे नसल्याचा वृथा साक्षात्कार आपणास होतो आणि निराशेचे ढग मनाला घेरतात. याबाबतीत सर्वांना माहीत असलेले उदाहरण पाहू या. छत्रपती शिवाजी महाराज, ज्यांनी स्वराज्य निर्माण केले. त्यांना आपण मोठे म्हणालो की रिकामे होतो. मात्र त्यांना हे मोठेपण मिळवताना कोणत्या मानसिक आंदोलनांना, संघर्षमय परिस्थितीला सामोरे जावे लागले याचा विचार करत नाही. चरित्रवाचन त्या दृष्टीने विचार करायला शिकवते.

छत्रपतींचा जन्म झाला त्यावेळी त्यांचे पिता शहाजीराजे त्यांच्यापासून शेकडो मैल दूर आदिलशहाकडे सरदार म्हणून काम करत होते. महाराजांना स्वराज्य उभा करताना अनेक सुहृदांना गमवावे लागले. त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले आणि लाडक्या पत्नीचा मृत्यू झाला. मोगलांशी तह करावा लागला. मिर्झाराजेंसोबतच्या तहाची पुर्तता म्हणून महाराज संभाजीराजेंसमवेत आग्र्याला गेले. तेथून मोठ्या शिताफीने सुटका करून घेतली. पण परतताना लाडक्या शंभू बाळाला मथुरेसारख्या अनोळखी प्रदेशात सोडून परतावे लागले. त्यावेळी पिता म्हणून त्यांना झालेल्या यातना आपणास कळत नाहीत. राज्याभिषेकानंतर थोड्याच दिवसांत माँसाहेब जिजाऊंचे निधन झाले. पुढे संभाजीराजांबरोबर दक्षिण स्वारीची तयारी केली आणि त्यांना वगळून स्वारी पूर्ण करावी लागली. हे आणि असे बरेच प्रसंगांना धीरोदात्तपणे सामोरे गेलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाकडे पाहिले की, आपण किती क्षुल्लक गोष्टींना अनाठायी महत्त्व देतो, हे जाणवायला लागते. अशा अनेक प्रसंगाना सामोरे जात अशी मोठी व्यक्तिमत्त्वे घडलेली असतात. त्यांचे चरित्र समजून घेणे म्हणजे ऊर्जेचे कुंभ प्राशन करण्यासारखे असते. अशा थोर व्यक्तींच्या चरित्रातून आपल्याला कायम प्रेरणा मिळते. कुसुमाग्रजांनी तर म्हणूनच ठेवले आहे की,

**'इतिहासाचे पान उलटूनी**
**चरित्र त्यांचे पाहा जरा,**
**त्यांच्यासम आपण व्हावे**
**हाच सापडे बोध खरा!'**

**- डॉ. व्ही. एन. शिंदे,**

उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ,
इमेल- vilasshindevs४४@gmail.com

10 MAY 2018

लोकमत




# साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# वाङ्मयीन परंपरा

वाङ्मयीन परंपरा या केवळ ग्रंथांच्या निर्मितीमधून घडत नसतात. तर, त्या त्या समाजाच्या उपस्थिती तून, वाहतेपणातून निर्माण होत असतात. भू-प्रदेश, पर्यावरण, लोकजीवन, राजसत्ता आणि व्यक्तिमनाची ती निर्मिती असते. वाङ्मयात त्या त्या प्रदेशाची स्थिती-गतीची संदर्भ चौकट असते. कोल्हापूरची वाङ्मयीन परंपरा तशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. अनेक विद्याशाखांनी समृद्ध आणि एकाचवेळी विविध प्रकारची डायमेन्शन देणारी ही परंपरा आहे. ती एकसाची राहिली नाही. अभिजात गंभीर स्वरूपाच्या वाङ्मय निर्मितीबरोबरच अत्यंत पॉप्युलर वाङ्मय निर्मितीचे स्त्रोत या प्रदेशाने पुरविले. त्यामुळे कलावंतांचे कोल्हापूर स्कूल संबोधावे, असे तिचे वैशिष्ट्य आहे. यातून कोल्हापूरच्या वाङ्मयीन परंपरेबद्दलचा भू-नकाशा शोधता येऊ शकतो.

कोल्हापूरच्या वाङ्मयीन परंपरेचे प्राचीन धागेदोरे शोधणे ही मुश्किल गोष्ट आहे. प्राचीन पुराणग्रंथ, ऐतिहासिक उल्लेख, ताम्रपट, लेख यातल्या काही तपशीलातून त्याचा केवळ अदमास लावता येऊ शकतो. प्राचीन काळातील वेगवेगळ्या राजवटींच्या मध्येही त्याच्या खुणा दडलेल्या आहेत. चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार, सातवहान, यादवकाळ, मुसलमानी राजवट, संस्थानी राजवट ते वासाहतिक राजवटीच्या संदर्भात अशी पाहणी करावी लागते. तसेच या परिसरातील बौद्ध, जैन धर्मियांच्या उपस्थितीची देखील दखल घ्यावी लागते. शैव-शाक्ताची परंपराही विसरता येणार नाही. पन्हाळ्यालगतची पांडवदरासारखी बौद्धलेणी, महालक्ष्मी मंदिर, खिद्रापूरचे मंदिर, जोतिबा मंदिर या मंदिर वैभवातूनही लोकराज जीवनाची काही अंगे ध्यानात घ्यावी लागतात. या विविध काळातील वाङ्मय भाषा निर्मितीचे स्त्रोत लुप्त झाले आहेत. काही खुणा मात्र पुराणग्रंथावर भिस्त ठेवून ध्यानात घ्याव्या लागतात.



दुसरा भाग आपल्याकडे केवळ लिखित परंपरेलाच वाङ्मय मानण्याची परंपरा आहे. प्रत्यक्षातल्या मानवी समूहाच्या तोंडी बोलण्याच्या इतिहासाकडे दुर्लक्ष केले जाते. अर्थात ते जतन केलेले नसते. मात्र मानवी लोकसाहित्याच्या वाहत्या परंपरेत प्रदेश, इतिहास व रीतीच्या विपुल खुणा पहायला मिळू शकतात. अगदी कोल्हापूर परिसरातील लोकगीते, कथा, म्हणी, वाक्प्रचार, भाषा एवढेच नव्हे, तर लोकवाद्ये, यातूनही वाङ्मयनिर्मितीचे आविष्कार शोधता येऊ शकतात. या मौखिक आविष्काराच्या दिशेने कोल्हापूर वाङ्मयनिर्मितीचे स्त्रोत आजमावता येऊ शकतात.

कोल्हापूर वाङ्मयनिर्मिती परंपरेत संस्थानी राजवट हा महत्त्वाचा हस्तक्षेप आहे. संस्थानी राजवटीत वाङ्मयाची अनेक केंद्रे होती. एक केंद्र राजाराम महाविद्यालयातील प्रबोधन काळातील विवेकपर शास्त्रीय ज्ञानाला पोषक वाटावे असे निर्मिती करणारे केंद्र, यातच एक पारंपरिक राष्ट्रवादी जाणिवांचे केंद्र आकाराला आलेले दिसते. तर तिसरे मध्यमवर्गीयांच्या जाणिवा-भावविश्वांना खतपाणी घालणारे वाङ्मयीन केंद्राचे भरणपोषण इथे झाले. फडके-खांडेकरांच्या मध्यमवर्गीय स्वप्नांकाक्षेला कोल्हापूरची आयती भूमी मिळाली. त्यांच्या वाङ्मय केंद्राच्या फांद्या मुंबई, पुणेकेंद्री होत्या. मात्र, ती विसावली कोल्हापूर भूमीत. याच काळात राजर्षी शाहूंच्या पाठिंब्यामुळे सत्यशोधक वाङ्मयाचे स्त्रोत पसरले. त्याची विचारभूमीही करवीरनगरी.

आणखी एका अंगाने हा वाङ्मयाचा विचार होऊ शकतो. स्वातंत्र्योत्तर काळात एकूण मराठीत मुख्यधारेत प्रभावी ठरणाऱ्या धारांची निर्मिती कोल्हापूर स्कूलमधून झाली. लोकप्रिय रंजनपर लेखनाची परंपरा तसेच ऐतिहासिक, पौराणिक, कादंबऱ्यांची लाटनिर्मितीची केंद्रे कोल्हापूर केंद्रातून आकाराला आली. संस्थानी राजवट, फडके-खांडेकरांचा प्रभाव व मराठी चित्रपटाचे सुवर्णयुग त्यातले आयडियल मेलोड्रामिक टाइप यामुळे या वाङ्मय धारांची निर्मिती झाली असावी का? तर प्रदेश स्थलांतर केल्यानंतर वर्ल्डव्यूव्हमध्ये फरक पडतो का? त्याची भू-समाजशास्त्रीय कारणे असू शकतात का? विजय तेंडूलकर व अरूण कोलटकर यांची जन्मभूमी कोल्हापूर तर, पुढील सर्वकाळ मुंबई त्यामुळे त्यांचे आधुनिकतेचे भान विस्तारण्यात प्रदेशाचा, भू-पर्यावरणाचा काही भाग असू शकतो का? या प्रकारच्या शोधातून कोल्हापूर वाङ्मय परंपरेच्या दिशा सापडू शकतील.